महत्त्वाचे



पंढरपूर : रविवारी अधिक मासानिमित्त दर्शनासाठी विठ्ठल मंदिरासमोर भाविकांनी केलेली गर्दी.

## भाविकांनी गजबजली पंढरीनगरी; शनिवार, रविवार वीकेंडमुळे गर्दी

**पंढरपूर : पुढारी वृत्तसेवा**

अधिक मास आठवडाभर राहिला आहे. त्यामाळे चंद्रभागा स्नान व श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी भाविकांची गर्दी पंढरीत वाढत आहे. यातच शनिवार व रविवार वीकेंडच्या निमित्ताने दोन लाखाहून अधिक भाविक पंढरीत आले. यामुळे पंढरीनगरी भाविकांनी गजबजली आहे. दर्शन रांग पत्राशेडमध्ये पोहोचली असून दर्शनासाठी ७ ते ८ तासाचा कालावधी लागत आहे. भर उन्हातही चंद्रभागा स्नान व विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी भाविकांची गर्दी दिसून येत आहे. मंदिर समितीकडून भाविकांसाठी दर्शन रांग, मंदिर परिसरात शेडनेट उभारून सावली तयार केली आहे. पिण्याचे पाणी, घुसखोरी रोखणे, सुलभ दर्शनासाठी व्हीआयपी दर्शनावर निर्बंध घालण्यात आले आहेत. तर मठ, मंदिरांमधून महिनाभर विविध कार्यक्रम सुरू आहेत. त्यामुळे भाविकांनी पंढरीनगरी गजबजली असल्याचे चित्र दिसत आहे. शहर व परिसरातील मठ, धर्मशाळांमधून अधिक मासात कीर्तन, भजन व प्रवचनाचे कार्यक्रम सुरू आहेत. यामध्ये भाविक तल्लीन झाले आहेत. अधिक मासानिमित्त दररोज लाखो भाविक पंढरीत चंद्रभागा स्नान व विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी सहकुटुंब येत आहे. यातच शनिवार व रविवारी वीकेंडला मोठ्या संख्येने भाविक आले. त्यामुळे शहरातील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## चुलत्याकडून पाचवर्षीय पुतण्याचा खून; दोन तासांत संशयिताला अटक

**दक्षिण सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरूर येथे चुलत्याने आपल्या अवघ्या पाच वर्षांच्या निष्पाप चिमुकल्या पुतण्याचा गळा दाबून खून केला. मंद्रुप पोलिसांनी आरोपीला अवघ्या दोन तासांत बेड्या ठोकल्या. त्याला न्यायालयासमोर हजर केले असता ११ जूनपर्यंत पोलिस कोठडी मिळाली. समर्थ कास्तार (वय ५) असे मृत मुलाचे नाव आहे. अंकुश परशराम कास्तार (२५, रा. हलसंगी, ता. तडी, कर्नाटक) असे अटक केलेल्या चुलत्याचे नाव आहे. खुनाची ही घटना शनिवारी घडली. शुक्रवारी दुपारी एक ते दीडच्या सुमारास अंकुशने समर्थला घरी बोलावले. मात्र थोड्यावेळाने अंकुशने समर्थला बेशुद्धावस्थेत उचलून आणत तो पत्र्यावरून पडल्याचे सांगितले. समर्थच्या डोक्यावर व हनुवटीवर जखमा, गळ्यावर काळे व्रण होते. समर्थला तातडीने सोलापुरातील खासगी रुग्णालयात नेले. मात्र त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन केल्यावर त्याला गळा दाबून मारल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, मंद्रूप पोलिसांनी तांत्रिक माहिती, स्थानिक माहितीदार आणि गोपनीय यंत्रणेच्या मदतीच्या आधारे अंकुशची चौकशी केली असता त्याने आपण समर्थचा गळा आवळून खून केल्याची कबुली दिली.

## शेतकरी कर्जमाफीसाठी पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन : आ. रोहित पवार

**पंढरपूर : पुढारी वृत्तसेवा**



राज्य शासनाने शेतकऱ्यांना २ लाख रुपयापर्यंत कर्जमाफी केली आहे. मात्र ही कर्जमाफी लागू करण्यासाठी नियम व अटी घातल्या आहेत. यामुळे यातून अनेक शेतकऱ्यांना वगळण्यात येणार आहे. कजर्माफी म्हणजे सर्व शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, या मागणीसाठी आ. रोहित पवार १२ जूनपासून पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजारांपर्यंतच्या कर्जमाफीची मर्यादा घालण्यात आली आहे. ही अट रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट दोन लाखांपर्यंत कर्जमाफी द्यावी. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांना २ लाखांवरील रक्कम आधी भरण्याची अट घालू नये. अनुदान देताना लागणारी सलग दोन वर्षे नियमित कर्ज भरण्याची जाचक अट पूर्णपणे रद्द करण्यात यावी.२०१७ च्या कर्जमाफीसाठी पात्र असूनही केवळ कागदपत्रांअभावी लाभापासून वंचित राहिलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना तत्काळ कर्जमाफी मंजूर करण्यात यावी. पीक विमा योजनेतील शेतकरी विरोधी जाचक 'ट्रिगर' अटी काढून टाकून, '१ रुपयांत पीक विमा योजना' पुन्हा लागू करण्यात यावी. सर्व शेतकरी कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यात यावी, या मागण्या आ. पवार यांनी केल्या आहेत.

# तापणारे महासागर बनताहेत मान्सूनचे आव्हान

## गत चार वर्षांत अरबी समुद्र, बंगालचा उपसागर मिळून एकूण १८ चक्रीवादळे

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महासागरात भरपूर पाणी असले तरी ग्लोबल वॉर्मिंगमुळे ते प्रचंड तापत आहेत. त्यांचे वाढते तापमान हेच भारतीय मान्सूनसमोरील नवे आव्हान ठरत आहे. गत चार वर्षांत अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर मिळून एकूण १८ चक्रीवादळे आली. त्यामुळे मानवासह निसर्गाला त्याची मोठी किंमत मोजावी लागली.

सोमवारी, ८ जून रोजी जागतिक महासागर दिन जगात सर्वत्र साजरा केला जाणार आहे. पृथ्वीच्या सुमारे ७१ टक्के पृष्ठभागावर महासागरांचे अस्तित्व असून ते जागतिक हवामान आणि जलचक्राचे प्रमुख नियंत्रक मानले जातात. भारतीय मान्सूनवर विशेषतः अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागरातील समुद्रपृष्ठ तापत आहे (सी सरफेस टेम्परेचर). समुद्राचे तापमान सामान्यपेक्षा जास्त झाल्यास बाष्पीभवन वाढते आणि वातावरणात अधिक आर्द्रता निर्माण होते. त्यामुळे काही भागांत अतिवृष्टीची शक्यता वाढते, तर काही भागांत पावसाचे वितरण विस्कळीत होऊ शकते.

### शास्त्रज्ञांची निरिक्षणे

- अरबी समुद्र हिंदी महासागराच्या इतर भागांच्या तुलनेत अधिक वेगाने तापत असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे.
- चक्रीवादळांची तीव्रता वाढणे, ढगफुटीसदृश पाऊस, मान्सूनमधील खंड यांसारख्या घटना अधिक वारंवार दिसत आहेत.
- बंगालच्या उपसागरातील उष्ण पाणी कमी दाब क्षेत्रांना ऊर्जा पुरवते, ज्यामुळे मान्सूनच्या पावसाची तीव्रता वाढू शकते.
- महासागरांचे तापमान वाढत राहिल्यास भारतीय मान्सून अधिक अनिश्चित होण्याची शक्यता आहे.
- किनारी परिसंस्था संवर्धन, कार्बन उत्सर्जनात कपात आणि महासागरांच्या आरोग्याचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे.
- जागतिक महासागर दिनानिमित्त महासागरांचे संरक्षण हे केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर भारताच्या मान्सून, अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे.



### अरबी समुद्रातील प्रमुख चक्रीवादळे

| वर | चक्रीवादळ | परिणाम |
|---|---|---|
| २०२१ | तौक्ते | महाराष्ट्रात मोठी हानी |
| २०२३ | बिपरजॉय | गुजरातमध्ये हानी |
| २०२३ | तेज | भारतावर परिणाम नाही |
| २०२४ | असना | किनारपट्टीवर नुकसानं |

### महत्त्वाची निरीक्षणे...

- अरबी समुद्र पूर्वीच्या तुलनेत अधिक वेगाने तापत असल्याने तिथे तीव्र चक्रीवादळांची संख्या आणि तीव्रता वाढत आहे.
- बंगालचा उपसागर अजूनही भारतातील सर्वाधिक चक्रीवादळनिर्मिती क्षेत्र आहे.
- तौक्ते (२०२१), बिपरजॉय (२०२३), यास (२०२१) आणि रेमल (२०२४) ही गेल्या पाच वर्षांतील सर्वाधिक प्रभावी चक्रीवादळे ठरली.
- २०२१ ते २०२४ या कालावधीत उत्तर हिंदी महासागर (अरबी समुद्र + बंगालचा उपसागर) क्षेत्रात सुमारे १८ पेक्षा अधिक चक्रीवादळे निर्माण झाली.

# कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी १,००० दिवस निर्णायक

## सॅम-मॅम बालकांवर विशेष लक्ष; आदिवासी भागांत उपाययोजना तीव्र करण्याचे निर्देश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कुपोषणाचे आव्हान अद्याप कायम असल्याने गंभीर तीव्र कुपोषित (सॅम) आणि मध्यम कुपोषित (मॅम) बालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश कुपोषण निर्मूलन टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांनी दिले. माता व बालकांच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस कुपोषण रोखण्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचे असल्याचे नमूद करत जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यावर त्यांनी भर दिला.

कुपोषित बालकांची स्थिती, उपचार व्यवस्थापन आणि विविध पोषण योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेताना बालकांचे नियमित वजन मोजणे, अद्ययावत नोंदी ठेवणे, पोषण पंधरवाडा, चावडी वाचन आणि समुदाय सहभागाच्या माध्यमातून जनजागृती वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या.



- राज्यातील सॅम आणि मॅम बालकांचे नियमित निरीक्षण व उपचारांवर भर.
- आदिवासी भागांतील रक्तक्षय, कमी वजनाची बालके आणि गर्भवतींच्या पोषणावर विशेष लक्ष.
- कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन.

आदिवासी भागातील मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, गर्भवती महिलांचे पोषण, रक्तक्षय नियंत्रण तसेच कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण कमी करण्यावर विशेष भर देण्यात आला. अमृत आहार योजनेच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला. लाभार्थ्यांना केळी, अंडी आणि इतर पोषक आहाराचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

धाराशिव, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मेळघाट, कोल्हापूर आणि निफाड आदी भागांतील स्थितीचा आढावा घेण्यात आला. काही ठिकाणी कुपोषणाविरोधातील उपाययोजना अधिक तीव्र करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. दुर्गम भागांमध्ये डे-केअर सेंटरचा विस्तार आणि माता-बालकांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले.

डॉ. सावंत म्हणाले, "कुपोषणमुक्त महाराष्ट्र हे केवळ शासकीय उद्दिष्ट नाही, तर राज्याच्या भावी पिढीच्या आरोग्याशी संबंधित मिशन आहे. बालकांच्या आयुष्यातील पहिले एक हजार दिवस अत्यंत महत्त्वाचे आहेत. या काळात योग्य पोषण, वेळेवर उपचार आणि प्रभावी देखरेख सुनिश्चित केली तर कुपोषणावर निर्णायक मात करता येईल. प्रत्येक जिल्ह्याने मोजता येतील असे परिणाम साधण्यावर भर द्यावा."

संक्षिप्त

## सांगलीत ८३ हजारांची गोवा बनावटीची दारू जप्त

**मिरज : पुढारी वृत्तसेवा**

सांगलीतील उत्तर शिवाजीनगर परिसरात राहत्या घरात बेकायदेशीरपणे साठवून ठेवलेल्या गोवा बनावटीच्या विदेशी दारूच्या साठ्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मिरज पथकाने रविवारी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी ८३ हजार रुपये किमतीची विविध कंपन्यांची विदेशी दारू जप्त केली आहे. या प्रकरणी विशाल मारुती पवार (२८, रा. उत्तर शिवाजीनगर, सांगली) या संशयिताला अटक करून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोल्हापूर विभागीय उपायुक्त विजय चिंचाळकर यांच्या सूचनेनुसार सांगली जिल्ह्याचे अधीक्षक प्रदीप पोटे यांनी जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना अवैध दारू धंद्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

## उमदीत तंबाखूजन्य पदार्थांच्या अड्ड्यावर छापा

**जत : पुढारी वृत्तसेवा**

उमदी (ता. जत) येथील हालोळी रोड परिसरामध्ये बंदी असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांचा साठा करून मावा तयार करणाऱ्या अड्ड्यावर उमदी पोलिसांनी शनिवारी रात्री छापा टाकला. कारवाईत पोलिसांनी ३ लाख २२ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अन्नसुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ६ जून रोजी रात्री साडेआठच्या सुमारास उमदी येथील हालोळी रोड परिसरातील एका घरावर छापा टाकण्यात आला. या कारवाईदरम्यान शासनाने बंदी घातलेला मावा तसेच त्याच्या निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य, यंत्रसामग्री आणि इतर वस्तू आढळून आल्या.

## मुलास मारहाणीच्या धक्क्याने वडिलांचा मृत्यू

**कुरळप : पुढारी वृत्तसेवा**

भावकीतील वादातून डोळ्यादेखत मुलाला झालेल्या मारहाणीचा धक्का सहन न झाल्याने वृद्धाचा मृत्यू झाला. ही घटना येडेनिपाणी (ता. वाळवा) येथे घडली. तानाजी बंडू रास्कर (७६) असे मृताचे नाव आहे. ही घटना सायंकाळी ७ च्या सुमारास येडेनिपाणी गावातील बिरोबा मंदिरासमोरील चौकात घडली. या प्रकरणी त्यांचा मुलगा हणमंत तानाजी रासकर (४०, रा. बिरोबा मंदिराजवळ, येडेनिपाणी) यांनी कुरळप पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संशयित इंद्रजित सोमाजी रासकर व सूरज पांडुरंग रासकर (दोघेही रा. येडेनिपाणी, ता. वाळवा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तीस लाखांच्या विम्यासाठी दिली मेहुण्यानेच तीन लाखांची सुपारी

## चोरोची येथील खुनाचा कवठेमहांकाळ पोलिसांकडून छडा

**कवठेमहांकाळ : पुढारी वृत्तसेवा**

चोरोची (ता. कवठेमहांकाळ) येथील विजापूर-गुहागर राज्य मार्गालगतच्या नाल्यात १९ मे रोजी दत्तात्रय भगवान चाबरे (४५, रा. संजयनगर, सांगली) यांचा मृतदेह डोक्याचा चेंदामेंदा केलेल्या अवस्थेत मिळून आला होता. त्यांच्या खुनाचे गूढ उकलण्यात कवठेमहांकाळ पोलिसांना यश आले आहे. मेहुण्यानेच बहिणीला होत असलेल्या त्रासातून ३० लाख रुपयांच्या विमा रकमेसाठी चाबरे यांच्या खुनाचा कट रचला व तीन लाखांची सुपारी देऊन मारेकऱ्याकडून खून केल्याचे उघडकीस आले आहे.

याप्रकरणी संशयित मेहुणा रामचंद्र धनाप्पा खिलारे (रा. अष्टविनायक नगर, विश्रामबाग, सांगली) व सुपारी घेणारा तुकाराम मारुती सांगोलकर (रा. खैराव, ता. जत) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांनाही अटक करण्यात आली आहे.

चोरोची गावच्या पूर्वेला सुमारे दीड किलोमीटर अंतरावर नाल्यात डोक्याचा चेंदामेंदा झालेल्या अवस्थेत १९ मे रोजी दत्तात्रय चाबरे यांचा मृतदेह आढळून आला होता.

रामचंद्र खिलारे याने ट्रकवर क्लिनर म्हणून काम मिळवून देतो, असे सांगितले होते. १७ मे २०२६ रोजी रात्री त्यांना तुंग (ता. वाळवा) येथे नेले. तेथे तुकाराम सांगोलकरही आला. तिघांनीही मद्यप्राशन केले.

यावेळी रामचंद्र खिलारे याने तुकाराम याचा ट्रक असल्याचे सांगून दत्तात्रय यांना त्याच्यासोबत पाठवून दिले. दत्तात्रय यांना घेऊन तुकाराम चोरोची परिसरात आला. १८ मे रोजी त्याने दत्तात्रय चाबरे यांना दारू पाजून दिवसभर फिरवले. यानंतर रात्री ११च्या सुमारास चोरोचीनजीक नाल्याजवळ त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. टॉमीसारख्या जड हत्याराने डोक्यावर, मानेवर आणि कानाखाली वार करून त्यांचा खून केला. पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह नाल्यामध्ये फेकून दिला.

### तीन लाख रुपयांची सुपारी




- चाबरे यांच्या नावावर असलेल्या सुमारे ३० लाख रुपयांच्या विमा रकमेचा लाभ घेण्यासाठी तसेच कौटुंबिक वादातून रामचंद्र खिलारे याने चाबरे यांच्या खुनाचा कट रचला. त्यासाठी त्याने तुकाराम सांगोलकर याला तीन लाख रुपयांची सुपारी दिली. यासाठी एक लाख रुपये अॅडव्हान्स स्वरूपात दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# ओबीसी एकवटला तर पळता भुई थोडी होईल

## लक्ष्मण हाके यांचा इशारा : आरक्षण वाचवा नाहीतर प्रस्थापितांना घरी बसवू

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

तुमचा डीएनए ओबीसी असेल तर ओबीसींचे आरक्षण वाचवा, नाहीतर तुम्हाला घरी बसवायला ओबीसींना वेळ लागणार नाही. अमेरिकेतील एका पोराच्या आवाहनावर जर देशातील तरुणाई एकवटत असेल, तर ५०-६० टक्के ओबीसी जेव्हा एकवटेल आणि राजकीय भूमिका घेईल, तेव्हा तुमची पळता भुई थोडी होईल. मुख्यमंत्री महोदय, तुम्ही ओबीसींना राजकारणात येऊही देत नाही. उद्या जेव्हा ओबीसींकडे मत मागायला याल, तेव्हा ओबीसी काय आहे हे दाखवून देऊ. येथील कारखानदार, भांडवलदार आणि सत्ताधाऱ्यांना घरी बसवू, असा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला.

सांगलीत एका कार्यक्रमासाठी आल्यानंतर हाके यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, इतर मागासवर्गीय समाजाप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती आणि इतर सोयी-सुविधा लागू करण्याचा जो निर्णय शासनाने घेतला आहे, त्याला कोणताही तर्क नाही. प्रत्येक निर्णयामागे काही अहवाल असतो. तसा इथे काही आहे का? झुंडीच्या दबावाखाली शासन निर्णय घेत आहे. असेच असेल तर ओबीसींच्या योजनांचे फायदे मराठा बांधवांनाच का देता? ते जैन आणि ब्राह्मण समाजाला का देत नाही? असे करून शासनाने घटनेला हरताळ फासला आहे. याविरुद्ध ओबीसींनी बोलायचेही नाही का? निवडणूकीपूर्वी तुम्हाला मदत करण्याची भूमिका आम्ही जाहीरपणे घेतली होती, पण तुम्ही ओबीसींना वाऱ्यावर सोडणार असाल तर आमच्याकडेही मतदानाचे बटण आहे, असेही हाके यावेळी म्हणाले.

# आता मालवणी खाजा झाला परप्रांतीय !

## सिंधुदुर्गात परप्रांतीय खाजा बनवणारी कंपनी

**मुंबई : राजेश सावंत**

कोकणातील जत्रेमध्ये आवर्जून मिळणारा मालवणी खाजा आता परप्रांतीय झाला आहे. पूर्वी स्थानिक कुटुंब खाजा बनवताना दिसत होती. आता खाजा बनवण्यारी बुद्धीराम विश्वकर्मा फुड्स एल. एल. पी. कंपनी कणकवली तालुक्यातील फोंडाघाट येथे सुरू झाली आहे. त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

कोकणी खाद्यपदार्थांना मुंबईत बाजारपेठ मिळावी यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी मुंबईच्या महापौरांना भेटून साकडे घालत आहेत. पण पारंपारिक कोकणी खाद्यपदार्थावर परप्रांतीय ताबा मिळवत असताना, लोकप्रतिनिधींचे मात्र दुर्लक्ष होत आहे. कोकणात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणी खाजा ही प्रसिद्ध मिठाई आहे. बेसन व गुळाचा पाक करून तयार केलेल्या या खाज्याला मुंबईत राहणाऱ्या कोकणी माणसांची सर्वाधिक पसंती आहे. त्यामुळे कोकणातील प्रत्येक जत्रेमध्ये खाजा मिळणार नाही असे होणारच नाही. एवढेच काय तर आता कोकणातील बाजारपेठेमध्येही खाज्याची मागणी वाढली आहे. पण हा खाजा आता कोकणी माणसाचा राहिलेला नाही. खाजाची वाढती मागणी लक्षात घेऊन, उत्तर प्रदेश बिहारी माणसाने सिंधुदुर्गात घुसखोरी केली आहे.

कोकणी माणसाचा हा पारंपारिक मालवणी खाजा आता बुद्धिराम विश्वकर्मा फूड्स कंपन्यांनी ताब्यात घेतला आहे. खाज्याची निर्मिती करून, तो कोकणातच नाही तर राज्यात विकला जात आहे.




### आमदारांचे मोघम उत्तर

मालवणी खाद्याचा परप्रांतीयांनी ताबा घेतल्याकडे आमदार प्रमोद जठार यांचे मुंबई महापालिकेत झालेल्या पत्रकार परिषदेत लक्ष वेधले असता, त्यांनी फारसे गंभीर्याने घेतले नाही. कोकणी माणसाकडे खाद्यपदार्थ बनवण्यासाठी मोठ्या कंपन्या उघडणे शक्य नसल्यामुळे पैसेवाले कंपन्या सुरू करून खाद्यपदार्थ बनवतात. असे मोघम उत्तर त्यांनी यावेळी दिले.

### हॉटेलमध्येही परप्रांतीय

कोकणामध्ये अनेक बेरोजगार तरुण असताना येथील हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात परप्रांतीय दिसून येतात. विशेष म्हणजे हे परप्रांतीय वेटर चक्क हिंदीमध्ये संवाद साधतात. मग काय आपला कोकणी माणूसही आपली मालवणी व कोकणी भाषा सोडून, तोडकी मोडकी हिंदी बोलून वेळ मारून घेतात. पण कोणीही या परप्रांतीयांसोबत मराठीत संवाद साधत नाही. त्यामुळे परप्रांतीयांची मुजोरी येणाऱ्या काळात वाढली नाही म्हणजे मिळवले .

खाज्याच्या पिशवीवर गंगू माऊली सुप्रसिद्ध मालवणी खाजा असा उल्लेख असला तरी, पॅकिंग पिशवीच्या खाली बुद्धीराम विश्वकर्मा फुड्स एल. एल. पी. कंपनी असा उल्लेख आहे. विशेष म्हणजे ही कंपनी कणकवली तालुक्यातील फोंडाघाट येथे आहे. परप्रांतीयांची कंपनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुरू होत असताना त्यांना परवाना कोणी दिला, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. कोकणी खाद्यपदार्थांना मुंबईत बाजार उपलब्ध करून देण्यासाठी भाजपाचे विधान परिषदेचे आमदार प्रमोद जठार यांनी महापौर रितू तावडे यांची भेट घेतली होती. जर कोकणी खाद्यपदार्थांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनिधी प्रयत्नशील असतील तर कोकणात येणाऱ्या परप्रांतीय कंपन्यांना का रोखले जात नाही, असा प्रश्न कोकणी माणसाला पडला आहे.

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

खेतीया शाखा : गायत्री मंदिरासमोर, पानसेमल रोड, खेतीया-४५१८८१ (म.प्र.)
ई-मेल : khetia@bankofbaroda.com

तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी येथे स्कॅन करा.

परिशिष्ट-IV-A नियम ८(६) आणि ६(२) च्या तरतुदी पहा

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) आणि ६ (२) च्या तरतुदींसह वाचली जावी.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार (कर्जदार), गहाणदार (गहाणदार) आणि जामीनदार (जामीनदार) यांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनको कडे गहाण/प्रभारित असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, ज्याचा ताबा सुरक्षित धनको बँक ऑफ बडोदाच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, खाली नमूद केलेल्या खात्यांमधील थकबाकी वसुलीसाठी ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे'' या तत्त्वावर विकली जाईल. कर्जदार/गहाणदार/जामीनदार/सुरक्षित मालमत्ता/थकबाकी/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे -

| कर्जदार/जामीनदार/गहाणदार यांचे नाव आणि पत्ता | स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन, ज्ञात बोजा असल्यास त्यासह | एकूण थकबाकी | ई-लिलावाची तारीख आणि वेळ | राखीव किंमत / ईएमडी / बोली वाढीची रक्कम | ताबा स्थिती (सांकेतिक/प्रत्यक्ष) | मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| कर्जदार: **१. मेसर्स गोकुळ गिनिंग फॅक्टरी** (भागीदारांमार्फत) पत्ता: सर्व्हे नं. ४८७/४, पी.एच. नं. १९ (नवीन पी.एच. नं. ०३) पानसेमल रोड खेतीया, तहसील-पानसेमल, जिल्हा-बडवानी (म.प्र.) - ४५१८८१ **२. श्री प्रविण शाह, वडील कै. जीवनलाल शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: हनुमान चौक खेतीया, जिल्हा बडवानी, म.प्र. ४५१८८१ **३. श्रीमती निरुपमा शाह पती प्रवीण शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: हनुमान चौक खेतीया, जिल्हा बडवानी, म.प्र. ४५१८८१ **४. श्रीमती शर्मिल शाह पती हरीश शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: B502 मंत्री क्लासिक, 1st मुख्य 8th क्रॉस, 4th ब्लॉक, STBed लेआउट, कोरामंगला, बंगलोर-५६००३४ **५. श्री अभिषेक शाह, वडील चेतन शाह** (कर्जदार आणि जामीनदार) पत्ता: B-४८/४०२, छत्रपती शिवाजी रोड, आनंद नगर, दहिसर (पूर्व), मुंबई **जामीनदार:** **१. श्रीमती राधिकाबेन पती स्व. जीवनलाल शाह** (जामीनदार) पत्ता: हनुमान चौक, खेतीया, तहसील-पानसेमल, जिल्हा-बडवानी म.प्र. ४५१८८१ **२. श्री हरीश शाह, वडील कै. जीवनलाल शाह** (जामीनदार) पत्ता: B५०२ मंत्री क्लासिक, 1st मुख्य 8th क्रॉस, 4th ब्लॉक, ST Bed लेआउट, कोरामंगला, बंगलोर-५६००३४ **३. श्री चेतन शाह, वडील कै. जीवनलाल शाह** (जामीनदार) पत्ता: B-४८/४०२, छत्रपती शिवाजी रोड, आनंद नगर, दहिसर (ई) मुंबई **४. श्रीमती वीणाबेन पती सुरेश श्रॉफ** (जामीनदार) पत्ता: अशोक नील सोसायटी सेक्टर नं. ०८, C/३१, ४था मजला, फ्लॅट नं. ४०३, मीरा रोड, पूर्व मुंबई ४००७१० | (१) **मेसर्स गोकुळ गिनिंग फॅक्टरीच्या** नावावर असलेली, सर्व्हे नं. ४८७/४, पी.एच. नं. १९ (नवीन पी.एच. नं. ०३) पानसेमल रोड, खेतीया, तह. पानसेमल जिल्हा: बडवानी (म.प्र.) येथे स्थित १.५१८ हेक्टर (१५१८० चौ.मी.) क्षेत्रफळाची लीज होल्ड डायव्हर्टेड फॅक्टरी जमीन आणि इमारतीचे समन्यायी गहाण. **सीमा:** पूर्व: नाला, पश्चिम: संचेती कोटेक्स, उत्तर: खेतीया-पानसेमल रोड, दक्षिण: मनोहर निकुम. | ₹ १२,२९,२३,५१९.१५/- (रुपये बारा कोटी एकोणतीस लाख तेवीस हजार पाचशे एकोणीस आणि पंधरा पैसे मात्र) + आणि इतर शुल्क व खर्च, + पुढील व्याज दिनांक ०१.०६.२०२५ पासून लागू. | ई-लिलावाची तारीख: ०७/०७/२०२६ ई-लिलावाची वेळ : सुरू होण्याची वेळ दुपारी २ वा. ते संपण्याची वेळ सायंकाळी ६ वा. | ₹ ५,२६,८०,०००/- / ₹ ५२,६८,०००/- / ₹ ५०,०००/- | प्रत्यक्ष ताबा | ०४/०७/२०२६ दुपारी १२:०० ते संध्याकाळी ०४:०० वाजेपर्यंत |
| | (२) श्री प्रवीण पिता श्री जीवनलाल शाह यांच्या नावावर असलेले, घर क्र. ३९, नगर पालिका, वॉर्ड क्र. ८, जवाहर मार्ग, खेतीया, तहसील पानसेमल, जिल्हा बडवानी (म.प्र.) येथे स्थित ७५० चौ. फूट क्षेत्रफळाच्या घराचे समन्यायी गहाण. **सीमा:** पूर्व: सुमित्राबाईंची उर्वरित जमीन, पश्चिम: प्रवीण कुमार पिता स्व. जीवनलाल शाह, उत्तर: रस्ता, दक्षिण: पुढील रस्ता. | | | ₹ ११,८०,०००/- / ₹ १,१८,०००/- / ₹ १०,०००/- | प्रत्यक्ष ताबा | |

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया बँक ऑफ बड़ौदाच्या **https://www.bankofbaroda.in**/e-auction या लिंकला आणि **Baanknet.com** या ऑनलाइन लिलाव पोर्टलला भेट द्या. तसेच, इच्छुक बोलीदार अधिकृत अधिकाऱ्यांशी **मोबाईल क्रमांक: ९७५२४१०७०५** वर संपर्क साधू शकतात.

**तारीख: ०६.०६.२०२६ ठिकाण: खेतीया** — **अधिकृत अधिकारी, बँक ऑफ बड़ौदा**